## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयल क्र.१ अकोला, यांचे न्यायालयात

MHAK030033542026

संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. २६६८/२०२६
निशाणी क्र. 5

### गुन्हयाचा तपशील

१. अपराध घडल्याचा दिनांक :- १२.०१.२०२६

२. अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक :- १२.०१.२०२६

३. फिर्यादीचे नाव :- सरकार तर्फे पोलिस ठाणे अधिकारी,
पोलिस स्टेशन जुने शहर, अकोला

४. आरोपीचे नाव पत्यासह :- **सलीम खान हसन खान,**
वय - ५० वर्षे, धंदा - ऑटो चालक
रा. जुने शहर अकोला, ता. व जि. अकोला.

५. ज्या बद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील.

दिनांक ०२.०१.२०२६ रोजी १९.०० वाजताचे सुमारास, कळंबेश्वर फाटा, जुने शहर अकोला येथे पेट्रोलिंग करत असताना तुम्ही तुमचा ऑटो नोंदणी क्र.MH-30-BC-0647 हे वाहन रहदारीस अडथळा होईल अशा रितीने व मानवी जीवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने सार्वजनिक रस्त्यावर उभे केले. त्याव्दारे तुम्ही भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८५ अन्वये गुन्हा केला.

वरील गुन्ह्याकरीता तुमची संपरिक्षा घेण्यात येत आहे.

### आरोपीची जबानी

प्रश्न क्र. १ :- तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या आहेत काय ?

उत्तर :- होय.

प्रश्न क्र. २ :- तुम्हाला तुमच्यावरील ठेवण्यात आलेला आरोप आता वाचुन दाखविला. तो समजला काय ?

उत्तर :- होय.

प्रश्न क्र. ३ :- तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर :- होय, मला गुन्हा कबूल आहे.

Bleem

(आरोपीची सही)

04.08.26

(आर. एस. सारुक)
प्र.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र. १, अकोला

आदेश

आरोपीने आजरोजी न्यायालयात हजर होऊन स्वेच्छेने गुन्हा कबूल केला. त्यानुसार त्याला शिक्षेबाबत विचारले असता त्याने तो त्याचे कुटुंबातील कर्ता पुरूष असून कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी त्याचेवरच असल्याने त्याला कमीत कमी शिक्षा व्हावी, असे प्रतिपादन केले. सर्व परिस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

आरोपी **सलीम खान हसन खान** यांना भारतीय न्याय संहिता २०२३ चे **कलम** २८५ या गुन्ह्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ नुसार रूपये **५००/-** (**अक्षरी रुपये पाचशे फक्त**) दंड व दंड न भरल्यास पाच दिवसाची साधी कैद अशी शिक्षा ठोठावण्यात येते.

ठिकाण – अकोला
दिनांक – ०४.०८.२०२६

04.08.26

(आर. एस. सारुक)
प्र.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र. १, अकोला

P.R No 1052
dt 04/08/2026
Rs. 500/- paid
[signature]
clerk
04/08/26